ARTHA
Poona 4.

Reg. No. B. 3434. Licence No. 53.
Licenced to post without prepayment

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

वर्ष १८ पुणें, बुधवार तारीख २ एप्रिल, १९५२ अंक १४

## विविध माहिती

**सिंद्रीच्या कारखान्याचा विस्तार**—सिंद्रीच्या खताच्या कारखान्यांत सध्यां अमोनिअम सल्फेट तयार होतें. त्या व्यतिरिक्त जड रसायनें आणि इतर खतें तयार करण्यासाठी कारखान्याचा विस्तार करण्याची शक्यता कितपत आहे, ह्यासंबंधीं भारतीय सरकार सध्यां विचार करीत आहे.

**लिप्टन कंपनीनें खटला जिंकला**—मेसर्स लिप्टन आणि कंपनीच्या कलकत्ता येथील जनरल मॅनेजरला चहांत भेसळ करण्याच्या आरोपावरून मॅजिस्ट्रेटनें दोषी ठरवून ५०० रुपयांचा दंड केला होता. कंपनीनें ह्या निकालाविरुद्ध कलकत्ता हायकोर्टात अपील केलें होतें. त्याचा निकाल लागून मॅनेजर दोषमुक्त ठरले.

**युनायटेड कमर्शिअल बँकेची शाखा**— यु क. बँकेनें हाँगकाँग येथें नुकतीच आपली शाखा उघडली आहे. बँकेचे जनरल मॅनेजर श्री. ठाकूर मुद्दाम हाँगकाँगला गेले होते. भारतांतील कच्चा माल आणि औद्योगिक माल ह्यांचा वाढता व्यापार लक्षांत घेतां हाँगकाँगला एखाद्या भारतीय बँकेची जरूर होतीच, असे उद्गार त्यांनीं शाखेच्या उद्घाटन प्रसंगीं काढले.

**नागपूरला ग्रामोद्योगाची शाळा**— मध्यप्रदेश सरकारनें नागपूर येथें ग्रामोद्योगाची शाळा काढण्याचें ठरविलें आहे. राज्यांतील ग्रामोद्योगासंबंधीं संशोधन करणें, उत्पादनाचीं केंद्रें खोलणें आणि विद्यार्थ्यांना शिकविणें हीं कामें शाळा करील.

**टेलिव्हिजन सेट मिळाला, पण**—नेपाळमधील एक विद्यार्थिनी 'न्यूयॉर्क हेरॉल्ड ट्रायब्यून'नें भरविलेल्या तरुण विद्यार्थ्यांच्या मेळाव्याला हजर रहाण्यासाठीं अमेरिकेला गेली होती. तेथें तिनें एका टेलिव्हिजनच्या कार्यक्रमांत भाग घेऊन बक्षिस मिळविलें. तिला एक टेलिव्हिजन सेट बक्षीस मिळाला. पण त्याचा उपयोग नेपाळमध्यें कसा होणार ? असा प्रश्न उपस्थित झाला आहे.

**मद्रास सरकारजवळील चित्रपटांचा संग्रह**— मद्रास सरकारच्या शिक्षण खात्याजवळ शास्त्रीय, सामाजिक, व शारीरिक शिक्षणविषयक असे १,२०० चित्रपट आहेत. ही संख्या आणखी वाढविण्याचा सरकारचा विचार आहे. राज्यांतील शाळांनीं सिनेमा दाखविण्याची सोय करावी म्हणून मद्रास सरकार बरेंच उत्तेजन देत असतें. आपल्याजवळील शैक्षणिक चित्रपट शाळांतून दाखविण्यासाठीं म्हणून मद्रास सरकार रोजीं एका चित्रपटामागे १॥ रुपया घेतें.

**डग्लस फेअर बँक्स भारतांत येणार**— डग्लस फेअर बँक्स ज्युनिअर हा सुप्रसिद्ध अमेरिकन नट व निर्माता भारतांत येऊन नंतर सीलोनलाहि भेट देणार आहे. 'एलेफंट वॉक' नांवाचा एक बोलपट तो सीलोनमध्यें काढणार आहे. ह्या बोलपटासंबंधीं स्टुडिओंतील सर्व काम मात्र भारतांत होणार आहे.

**सांगलीला सहकारी डेअरी**—सांगली येथील पांजरपोळ संस्थेनें सहकारी तत्त्वावर एक डेअरी काढण्याचें ठरविलें आहे. 'गीर' जातीच्या २७ गाई अहमदाबाद येथें विकत घेण्यांत आल्या असून त्या लवकरच सांगलीला नेण्यांत येतील. संस्थेला ह्या गाई सरकारतर्फे देण्यांत आल्या आहेत.

**वानलेस रुग्णालयाला मदत**— सांगलीपासून जवळच असलेल्या वानलेस रुग्णालयाला प्रेस्बिटेरिअन चर्चच्या फॉरेन मिशन बोर्डानें २०,००० डॉलर्स मदत म्हणून दिले आहेत. २० हजार डॉलर्स म्हणजे सुमारे १ लाख रुपये होतात. संस्थेची आर्थिक परिस्थिति अलीकडे फारशी समाधानकारक नव्हती.

**भारतामधील प्रेक्षणीय स्थळांचा चित्रपट**— ब्रिटनमधील बी. ओ. ए. सी. कंपनीनें भारतामधील प्रेक्षणीय स्थळांचा चित्रपट काढण्याचें ठरविलें आहे. आग्रा, जयपूर, वेरूळ, पुरी व गया इत्यादि ठिकाणीं जाऊन चित्रपट घेण्यांत येणार आहेत. भारतांत येणाऱ्या प्रवाशांची संख्या वाढावी म्हणून हा चित्रपट सर्व जगभर दाखविण्यांत येणार आहे.

**मद्रास राज्यांतील ग्रामोद्योग**— मद्रास राज्यांतील ग्रामोद्योगाची पहाणी करण्याचें मद्रास सरकारनें ठरविलें आहे. सर्व राज्यांत मिळून सुमारें १०,००० ग्रामोद्योगाचीं केंद्रें असतील असा अंदाज आहे. ग्रामोद्योगांत गुंतलेल्या माणसांची संख्या, त्यांना लागणारा कच्चा माल, इत्यादि दृष्टीनें पहाणी करण्यांत येणार आहे.

**ग्रँट मेडिकल कॉलेजला देणगी**— मुंबईच्या ग्रँट मेडिकल कॉलेजच्या पहिल्या वर्षाच्या अभ्यासक्रमासाठीं ज्या विद्यार्थ्यास अखेरचें घेतलें जाईल, त्याला पुढील वर्षापासून ५० रुपयांचीं वैद्यकीय पुस्तकें देणगी म्हणून मिळणार आहेत. कल्याण येथील श्री. वैद्य नांवाच्या गृहस्थांचा मुलगा गेल्या वर्षी नदींत बुडून मरण पावला होता. त्याच्या स्मरणार्थ कॉलेजला 'वरील' देणगी देण्यांत आली आहे. रकमेच्या व्याजांतून गरीब रोग्यांना औषधोपचारहि करण्यांत येणार आहे.

## राष्ट्रीयकरणाची पूर्वतयारी कशी करतां येईल ?

(श्री. मुकुंद पु. दाणी, बी. कॉम्. २९४, बळीरामपेठ, जळगांव.)

केवळ भारतांतच नव्हे तर सर्व पुढारलेल्या राष्ट्रांतूनसुद्धां सामान्य जनतेच्या नित्योपयोगी वस्तूंच्या किंमती इतक्या वाढल्या आहेत कीं त्यांची आहे यापेक्षां अधिक वाढ होऊं नये, या एकाच उद्देशानें साधारण स्थितींतलीं राष्ट्रें सध्यां आटोकाट प्रयत्न करीत आहेत. भारतापुरताच विचार केला असतां ही परिस्थिति अधिकच तीव्र असल्याचें दिसून येतें. नैतिक मूल्यांच्या अट्टाहासामुळें अनेक राज्यसरकारें आपलीं अंदाजपत्रकें तुटीचींच दाखवून केंद्रसरकारकडे कर्जाची अपेक्षा करीत आहेत. बरें, केंद्रसरकारची परिस्थितीसुद्धां त्यांच्याहून फारशी वेगळी नाहीं. निर्वासितांची पुनर्वसाहत, अन्नधान्याची आयात आणि पंचवार्षिक योजना यासारख्या अत्यंत जरूरीच्या .पण खर्चिक बाबींकरितां नाइलाजानें इतर धनिक राष्ट्रांकडे मदतीकरितां याचना करावयाची वेळ केंद्र सरकारवरही आली आहे. थोडक्यांत, उघडें गेलें नागड्यापाशीं अशीच बहुधा सर्व राज्यसरकारांची स्थिति आहे. औद्योगिक क्षेत्रांत अलिकडे तीव्रतेनें भासणाऱ्या भांडवलाच्या तुटवड्याचा फायदा घेऊन धनिक वर्गानें राष्ट्रीय सरकारशीं असहकाराचा सौम्य लढाच पुकारला आहे कीं काय, असें वाटं लागतें, आणि या परिस्थितीमुळेंच उद्योगधंद्यांच्या राष्ट्रीयकरणासारखा महत्त्वाचा प्रश्न आम्हाला तूर्त तरी बाजूला सारावा लागत आहे. तंत्रज्ञांचा अभाव ही दुसरीही एक प्रमुख अडचण त्या मार्गांत आहे. राष्ट्रीयकरणाचें तत्त्व आमच्या सर्व प्रमुख राजकीय पक्षांना एकदम मान्य आहे. सत्तारूढ पक्षाला राष्ट्राच्या आर्थिक कुवतीची कल्पना चांगलीच असल्यानें जनतेच्या आकांक्षा ओळखूनहि "आम्हाला तेंच करायचें आहे, पण जरा दमानें घ्या" अशी सूज्ञ शब्दांत जनतेची समजूत घालावी लागत आहे; पण ही गोष्ट यापेक्षां अधिक दिरंगाईवर टाकणें जनतेच्या आणि पर्यायानें राष्ट्राच्या हिताचें होणार नाहीं.

राष्ट्रीयकरणाच्या मार्गांतील अडचणींची जाणीव असलेला, तें आजही शक्य आहे, असें म्हणूं शकणार नाहीं. राष्ट्राची संपात्तिक स्थिति चांगली सुधारेपर्यंत भांडवलशाहीच्या पकडींतुन हळू हळू मोकळें होऊन संपूर्ण राष्ट्रीयकरणाचा मार्ग बराच सुलभ करणें लोकशाही कार्यपद्धति अस्तित्वांत असलेल्या कांहीं खाजगी औद्योगिक आणि व्यापारी संस्थांना आजही शक्य आहे, नव्हे आजच्या परिस्थितींत ती त्यांची जबाबदारीच आहे, असें म्हणण्यास मुळींच हरकत नाहीं. लोकोपयोगी कार्य सर्वस्वीं जनतेच्या सहकार्यावरच अवलंबून आहे व त्यांनींच या बाबतींत पुढें सरसावलें पाहिजे अशी स्पष्ट सूचना सरकारनें केली असतांना ती डावलून लावण्यांत आपलीच ध्येयसिद्धि खोळंबून राहील. याकरितां आपल्या कर्तव्यांतील वाटा आपणास आजही कसा उचलतां येईल याची एक योजना आपल्यापुढें मांडीत आहे. ती निर्दोष कशी करतां येईल हें आपण सर्वस्वीं अर्थतज्ञांवरच सोपवूं. परंतु, कल्पनेस मान्यता मात्र आपण द्यावयाची आहे.

### योजनेचें क्षेत्र

योजनेची अम्मलबजावणी करण्याकरतां तिला अनुकूल अशा धंद्यांची व त्यांतील संस्थांची निवड करावी लागेल. ती सरसकट सर्व धंद्यांना अथवा संस्थांना एकदम लागूं करणें शक्य व इष्टही होणार नाहीं. प्रथम सांगितल्याप्रमाणें ज्या संस्थांची कार्यपद्धती संपूर्ण लोकशाही धर्तीवर आधारलेली आहे अशा संस्थांचीच व विशेषतः निरनिराळ्या प्रकारच्या धंद्यांतल्या संस्थांची निवड करावी. तसेंच अशा संस्थांपैकीं ज्या संस्थांनीं पुरेशी राखीव गंगाजळी साठवून ठेविली आहे, ज्यांचें भाग भांडवल, विविध गंगाजळी व ठेवी मिळून स्वतःचें भांडवल संस्थेच्या कार्याकरितां पुरेसें आहे कीं त्यामुळें ज्यांना त्यांच्या स्थावर मालमत्तेच्या तारणावर बाहेरून कर्ज उभारण्याची जरूरी भासत नाहीं, अशाच संस्थांची प्रथम निवड करावी.

प्रयोगादाखल सुरवात करावयाची झाल्यास सहकारी संस्थांचें क्षेत्र अधिक बिनधोक आहे. मात्र या संस्था मध्यवर्ती स्वरूपाच्या असाव्यात, प्राथमिक स्वरूपाच्या त्या नसाव्यात. मध्यवर्ती या अर्थी कीं ज्यांचा मुख्य उद्देश प्राथमिक सहकारी संस्थांना केवळ भांडवलाचा पुरवठा करणें हा आहे अशा. यामुळें त्यांच्या कार्यावर घातुक परिणाम होण्याचा मुळींच संभव राहणार नाहीं. प्राथमिक सहकारी संस्थांचा या योजनेकरतां तूर्त विचार देखील करूं नये.

या योजनेकरितां आणखी एक महत्त्वाची दक्षता अशी घ्यावी कीं ज्या संस्था नवीन प्रकारच्या धंद्यांत कार्य करीत आहेत अशा संस्थांच्या मुळींच वाटेस जातां उपयोगी नाहीं. उद्योगधंद्यांतील नवीन क्षेत्र सर्वस्वीं भांडवलशाहीकरितां राखून ठेवावें व त्यांतच ते आपलें सर्वस्व ओततील अशा जरुर त्या सर्व सवलतीही त्यांना देण्यांत याव्यात. परंतु ज्या औद्योगिक आणि व्यापारी क्षेत्रांत बऱ्याच संस्था पुष्कळ वर्षांपासून कार्य करीत आहेत—आणि अशाच क्षेत्रांत योजनेला लायक अशा कांहीं मोठ्या संस्था सांपडणें शक्य आहे — त्यांचीच प्रथम निवड करावी.

### कायद्याची मदत

संस्थांची निवड झाल्यावर योजनेच्या अंमलबजावणीसाठी कायद्याच्या मदतीची कांहींशी आवश्यकता आहे. त्याशिवाय ही योजना सुरू करणें कदाचित् घातुक ठरेल. संस्थांच्या पोटनियमांतही त्यानुसार बदल करून घेणें आवश्यक होईल.

योजनेला मान्यता मिळण्याचा संभव दिसतांच अशा संस्थांचें भांडवल, संस्थांचे भागीदार काढून घेण्याचा संभव आहे. याकरितां भांडवल परत करण्यास सुरवातीसच कायद्यानें अथवा वटहुकुमानें मनाई करण्यांत यावी, कीं जेणेंकरून अशा संस्थांचें भांडवल कायम राहून योजना लागूं केल्यानें संस्थेला भांडवलाचा तुटवडा भासणार नाहीं. त्याबरोबरच भांडवलाची वाढ करण्यासही मनाई करण्यांत यावी. कारण हें भांडवल योजनेच्या मुदतींत हळू हळू परत करून पूर्णपणें नाहींसें करण्यावरच योजनेची सर्व मदार आहे. भांडवल कायम ठेवून अथवा कमी करूनही जर भांडवलावरील व्याज (डिव्हिडंड) संस्थेनें जास्त प्रमाणांत देण्यास सुरवात केली तरीही ही योजना अयशस्वी होईल. म्हणून डिव्हिडंडचा दर योजना लागूं करण्यापूर्वी जो असेल तो त्यापेक्षां वाढविण्यास मनाई करणेंही तितकेंच जरूरीचें आहे. डिव्हिडंडशिवाय इतर मार्गानेंही नफ्याची वांटणी जास्त प्रमाणांत करून संस्थेची राखीव गंगाजळी वाढूं न देण्याकडे भागीदारांचा कल होईल म्हणून नफा वांटणीस सरकारची सम्मती घेण्याची अशा संस्थांवर सक्ति करण्यांत यावी.

शेअर भांडवलांत वाढ करण्याची मनाई केल्यामुळें संस्थेला बाहेरील ठेवी स्वीकारण्याबाबत अथवा कर्ज उभारण्यावर जीं प्रचलित बंधनें असतील तीं थोड्या प्रमाणांत सैल करावीं लागतील. नाहींतर, संस्थेचा व्यवहाराचा व्याप वाढत असल्यास या विशिष्ट चौकटींत कार्य करण्यांत संस्थेला अडचण निर्माण होण्याचा संभव आहे. (अपूर्ण)

# अर्थ

बुधवार, ता. १ एप्रिल, १९५२





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे


## परकी भांडवल व अखिल भारतीय कारखानदार परिषद

दिल्ली येथें मार्च अखेर अखिल भारतीय कारखानदार संघटनेची परिषद दोन दिवस भरली होती. त्या परिषदेंत हिंदमध्यें गुंतविल्या जाणाऱ्या परकी भांडवलाबद्दल अशा आशयाचा ठराव पास करण्यांत आला कीं, ज्या क्षेत्रांत हिंदी भांडवल मोठ्या साहसानें औद्योगिक विकासासाठीं गुंतविलें जात आहे अशा ठिकाणीं परकी भांडवल गुंतविलें जाणें हें हिंदच्या आर्थिक परिस्थितीला नुकसानकारक ठरेल. सरकार हल्ली परकी भांडवल व हिंदचें भांडवल यांमध्यें फरक मानीत नाहीं, तेव्हां ज्या बाबतींत विदेशी भांडवल हिंदच्या साहसाच्या व राष्ट्रीय हिताच्या आड येत असेल अशा बाबतींत हिंदी देशी उद्योगधंद्यांना मिळणाऱ्या न्याय्य मदतीच्या आड हें परकी भांडवल येतां कामा नये. कोणत्याहि जाचक अटींशिवाय परकी भांडवल गुंतविलें गेल्यास त्याचें स्वागत केलें जाईल असें एका वक्त्यानें सुचविलें. भावी काळांत आपण परकी भांडवलदारांचे केवळ नोकर बनत नाहीं या गोष्टीकडे लक्ष पुरविलें पाहिजे असेंहि मत व्यक्त झालें. या परिषदेंत भाषण करतांना श्री. विश्वेश्वरअय्या म्हणाले कीं, औद्योगीकरणासाठीं जोरदार कार्यक्रम आंखला जावा. पंचवार्षिक योजनेनें आखलेला कार्यक्रम या दृष्टीनें वाजवीपेक्षा जास्त सावधगिरीचा आहे. उद्योगधंदे व धरणांचीं बांधकामें यासाठीं यंत्रें तयार करण्याचे कारखाने सुरू होणें जरूर आहे. उत्पादनाच्या मालामध्यें लोखंड व पोलाद यांना प्रथम स्थान दिलें पाहिजे, कारण देशाला आर्थिक मजबुती प्राप्त करून देऊन संरक्षणाच्या दृष्टीनेंहि त्यांचा उपयोग होतो. हिंदच्या प्रत्येक प्रांतांत निदान एक ते तीन नवीन उद्योगधंदे सुरू करणें आवश्यक आहे. उद्योगधंद्यांचा विकास व्हावा याबद्दल त्यांनीं विस्तारानें योजना मांडली. त्याचा थोडक्यांत आशय असा कीं मोठ्या प्रमाणांत चालणारे महत्त्वाचे उद्योगधंदे ' वर्ग पहिला ' म्हणून मानण्यांत यावे व बैठे धंदे ' वर्ग दुसरा ' समजावे. या दोन प्रकारांच्या उद्योगधंद्यांच्या विकासासाठीं दोनें कमिट्या नेमाव्या. प्रत्येक कमिटीचे तीन सभासद असावेत. या कमिट्यांनीं मध्य सरकारच्या उपमंत्र्यांच्या नेतृत्वाखालीं काम करावें. या कमिट्यांचा खर्च वर्षाला रु. १० लाखांच्या आंत येईल, परंतु त्यामुळें वर्षाला रु. ९७० कोटींचें उत्पादन व्यवस्थितपणें चालू राहील. उद्योगधंद्याच्या खात्याची पुनर्घटना केली पाहिजे असें ते म्हणाले. व्यापाऱ्यांच्या अडचणींबद्दल बोलतांना ते म्हणाले कीं, सरकार आपलें धोरण व मार्ग बदलील तर कांहीं अडचणी दूर होतील. देशाचें दारिद्र्य ज्यामुळें दूर होईल व सर्वांना मान्य होईल अशी योजना सरकारनें हातीं घ्यावी. जोंपर्यंत हिंदमधील जनतेचें राहणीचें मान पश्चिम युरोप किंवा अमेरिका यांच्या राहणीच्या मानानें एक-बारांशाहूनहि कमी आहे तोंपर्यंत विकासाची कोणतीहि योजना अपुरीच पडेल असें ते म्हणाले.

अखिल भारतीय कारखानदार परिषदेंत परकी मदत, परकी भांडवल, परराष्ट्रीय व्यापाराचें नियमन व मजुरांच्या स्वास्थ्याचे प्रश्न यांबद्दल ठराव पास झाले. कोणत्या बाबतींत परकी भांडवल गुंतविलें जावें याचा स्पष्ट निर्देश सरकारनें करावा अशी मागणी एका ठरावांत करण्यांत आली. सरकारनें योग्य बाबतींत नुकत्याच तेल शुद्धीकरणाच्या परकी कारखान्यांना ज्या सवलती दिल्या, तशाच हिंदच्या कारखानदारांनाहि द्याव्या अशीहि मागणी एका ठरावानें करण्यांत आली.

---

## शास्त्रीय शोधांची कुचंबणा

पुणें येथील नॅशनल केमिकल लॅबोरेटरीचे डायरेक्टर, प्रो. जेम्स मॅकबेन, ह्यांच्या वयास २२ मार्च, १९५२ रोजीं ८० वर्षे पुरीं झालीं. त्या प्रसंगीं त्यांच्या अभिनंदनपर झालेल्या समारंभाचे सभेंत त्यांनीं भाषण करतांना काढलेले उद्गार अत्यंत महत्त्वाचे आहेत. शास्त्रीय शोधांचा उपयोग करून सामान्य जनतेपर्यंत ते पोंचविण्यासंबंधीं भारतांत जी अनास्था दिसून येते तिमुळें कुचंबणा होत असल्याचें त्यांनीं बोलून दाखविलें. प्रो. मॅकबेन ह्यांनीं ह्यासंबंधीं एक उदाहरणच सांगितलें. ते म्हणाले कीं रंग आणि रोगण तयार करण्यांत कमळाच्या बियांचा उपयोग होतो हें आतां सिद्ध झालेलें आहे. पण ह्या बिया गोळा करण्यासाठीं मध्यवर्ती व राज्य सरकारांच्या यंत्रणांचा उपयोग करून घेण्याचा अधिकार लॅबोरेटरीला नाहीं. त्यामुळें ह्या बिया लक्षावधि संख्येनें जंगलांतच कुजून जात आहेत. भारतानें खूप खर्च करून मोठाल्या प्रयोगशाळा बांधल्या आहेत. परंतु त्यांचा उपयोग चांगल्या तऱ्हेनें करून संशोधनाचीं फळें सर्व देशाला मिळणें अत्यंत अगत्याचें आहे. हें कसें घडवून आणावें हा एक प्रश्नच आहे. ज्या शास्त्रज्ञांच्या शोधाचा प्रत्यक्ष व्यवहारांत उपयोग करण्यांत येईल त्यांची अशा उपयोगाच्या बाबतींत सल्लामसलत घेतली पाहिजे. डॉ. भटनागर ह्यांनीं, संशोधनाचा म्हणावा तितका उपयोग करून घेतला जात नसल्याचें कबूल केलें. लॅबोरेटरींत लागलेल्या शोधांचा उपयोग करून घेण्याचें काम भारतीय सरकारच्या उद्योग व व्यापार खात्याकडे आहे. लॅबोरेटरींत लागलेल्या शोधांचा उपयोग करून घेण्यासंबंधीं भारतीय सरकारला खाजगी कंपन्यांकडून आतांपर्यंत १२ लाख रुपये रॉयल्टीदाखल मिळाले आहेत असें समजतें.

---

**मलेरिआवर नवीन औषध**—अमेरिकन लष्कराच्या आरोग्यशाखेनें मलेरिआवर एक नवीन औषध शोधून काढलें आहे. ह्या औषधानें ताप मुळींच न येणें आणि आलेला जाणें, अशीं दोन्हीं कामें होतात. औषध १४ दिवस ओळीनें घ्यावें लागतें. ह्या औषधाचा स्वतःवर प्रयोग करून घेण्यास कोरिआंतील शेंकडों अमेरिकन सैनिकांनीं तयारी दाखविली आहे.

### दि बँक ऑफ औंध लि.

वरील बँकेच्या ठेवींत अहवालाचे वर्षी ७५,००० रु. ची वाढ झाली आहे, ही गोष्ट बँकेवरील विश्वासाची द्योतक आहे. पैशाच्या कठीण काळांत, अल्पावधींत बँकेचे ९,९०० रु. चे नवे शेअर्स खपले आहेत, हीहि गोष्ट अभिनंदनीय आहे. भारत सरकारनें बँकेला १,७६,१८० रु. दर्शनी किंमतीचे ८,८०९ भाग विक्रीस काढण्यास मंजुरी दिलेली आहे. १-१-१९५२ रोजीं बँकेची आटपाडी शाखा मुंबई प्रां. सहकारी बँकेस जोडण्यांत आली. औंध संस्थानाच्या विलिनीकरणानंतर बँक ऑफ औंधला आटपाडी क्षेत्रांत पूर्ववत व्यवहार करणें नव्या कायद्यामुळें अशक्य झालें होतें; आतां प्रां. सहकारी बँकेला तेथें व्यवहार वाढवितां येईल व बँक ऑफ औंधचीहि कुंचबणा थांबली आहे. ह्याच प्रकारें विजापूर डि. सें. को. बँकेनें व उ. सातारा डि. सें. को. बँकेनें बँक ऑफ औंधचा सहकारी सोसायट्यांशीं असलेला त्यांचे क्षेत्रांतील व्यवहार स्वतःकडे घेणें सर्वांच्याच हितार्चें होणार आहे. त्या दृष्टीनें डायरेक्टरांचे प्रयत्न चालू आहेत, त्यास यश येईल अशी अपेक्षा आहे. बँक रेट वाढल्यामुळें रोख्यांची किंमत उतरली, त्याची कांहीं तरतूद नफ्यांतून करावी लागली, सरकारी रोख्यांच्या विक्रींतील ३,९३७ रु. तोटा खर्चीं टाकला व १,६७४ रु. बुडींत खर्च येण्याची तरतूद केली, तरी सुद्धां १,६८६ रु. नोकरवर्गास बोनसची तरतूद करून आणि ९४४ रु. शिलकी नफा धरून निव्वळ नफा १०,८७६ रु. झाला आहे. तो अत्यंत समाधानकारक आहे इतर बँकांकडून कर्जें न घेतां, बँक ऑफ औंधनें ताळेबंदांतील आपला कर्जाचा व्यवहार केला आहे. अहवालाचे वर्षी, शेठ कालिदास भाईचंद ह्यांचे जागीं डॉ. एम्. डी. बोकील ह्यांस बोर्डावर घेण्यांत आलें. बँकेचा व्यवहार सुरळीत चालू होता, आणि त्यांत प्रगति झालेली आढळते. निव्वळ नफ्यांतून २,०५० रु. रिझर्व्ह फंडांत टाकावे, ३,५०० रु. ची कर-तरतूद करावी, १,००० रु. कॉंटिन्जन्सी फंडाकडे वर्ग करावे व २½% डिव्हिडंडसाठी ४,०९० रु. चा विनियोग करावा, अशी डायरेक्टरांची शिफारस आहे. ह्या नफा वाटणीनंतर, रिझर्व्ह फंड ५३,५०० रु. होईल व कॉंटिन्जन्सी फंड २६,००० रु. होईल. म्हणजे, १४½ लक्ष रुपयांच्या खेळत्या भांडवलांत बँकेचें स्वतःचें भांडवल सुमारें २½ लक्ष रु. होईल. भागीदारांस व ठेवीदारांस, दोघांसहि ही परिस्थिति समाधानकारक वाटेल. (चेअरमनः नरहर गंगाधर जोशी, बी. ए., एलएल. बी. मॅनेजर : बी. डब्ल्यू. घमंडे, सी. ए. आय. आय. बी., वा. सभा. ११-४-५२)

### पोस्ट ऑफिस सेव्हिंग्ज बँक ठेवीः नवे नियम

१ एप्रिल, १९५२ पासून पुढें कोणत्याहि एका ठेवीदाराचे नांवानें पो. ऑ. से. बँक खात्यांत १५,००० रु. राहूं शकतील. दोघांच्या जोड नांवानें ३०,००० रु. ठेवता येतील. १०,००० रु. खालील कोणत्याहि शिलकेस २% व्याज मिळेल. १०,००० रु. वरील रकमेस १½% व्याज मिळेल. कोणत्याहि महिन्यांत ४ तारीख व शेवटची तारीख ह्यांचे दरम्यान केव्हांहि २५ रु. चे खालीं खात्यांतील शिल्लक गेली, तर त्या खात्यास त्या महिन्यांत व्याज मिळणार नाहीं. संबंध वर्षांत हिशेबानें आठ आणेहि व्याज झालें नाहीं, तर तें दिलें जाणार नाहीं.

### युनायटेड कमर्शिअल बँक रिव्ह्यू

वरील त्रैमासिकाचा परामर्श "अर्था" च्या गेल्या अंकांत घेण्यांत आला आहे, त्यांत रिव्ह्यूच्या संपादकाचें नांव जी. बी. पानसे, बी. ए. (ऑक्स.) असें दिलें आहे, तें वास्तविक जी. बी. कणसे, बी. ए. (ऑक्स.) असें पाहिजे.

### कोरेगांव को. पीपल्स बँक, लि. कोरेगांव ( उ. सातारा )

चैत्र शु॥ १ च्या सुमुहूर्तावर या बँकेचे एक संस्थापक व सुरवातीपासून गेल्या वर्षापर्यंतचे प्रेसिडेंट आणि कोरेगांव येथील प्रथितयश वकील श्री. ग. रा. ऊर्फ आप्पासाहेब कुलकर्णी यांचा बँकेतर्फे जाहीर सत्कार करण्यांत आला. या प्रसंगीं त्यांच्या तलचित्राचें अनावरण आणि त्यांना थैली देण्याचा समारंभहि करण्यांत आला. बँकेच्या जुन्या-नव्या नोकरवर्गानें त्यांना एक सुवर्णमुद्रिका दिली. समारंभाचे समयीं श्री. कुलकर्णी यांचे जुने-नवे स्नेही आणि सहकारी यांनीं त्यांच्याबद्दल गुणगौरवाचे उद्गार काढले.

### गंगा नदीवर रेल्वे पूल

गंगा नदीवर ब्रॉडगेज रेल्वे पुलासाठी योग्य जागेची निवड करण्याचें काम सर एम. विश्वेश्वर अय्या ह्यांचेकडे सोपविण्यांत आलें आहे. ह्या पुलामुळें नदीच्या दोन्ही तिरांवरील ब्रॉड व मीटर गेज रेल्वे लाइनी जोडल्या जातील.


पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि. च्या सभासदांकरितां

## नोटीस

पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि. ची स्पेशल साधारण सभा रविवार दिनांक २० एप्रिल १९५२ रोजीं दुपारीं ३ वाजतां पुणें येथें बँकेच्या मेन हॉलमध्यें भरणार आहे.

सदर सभेंत खालील कामें करण्यांत येतील:—

(१) दिनांक १६ सप्टेंबर १९५१ च्या वार्षिक सभेचा वृत्तांत कायम करणें.

(२) खालील पोट नियमांत सुचविलेल्या दुरुस्तीचा विचार करणें. (पो. नि. २१ व ५९ दुरुस्त्यांचा मसुदा).

(३) मे. चेअरमन यांचे परवानगीनें ऐनवेळीं येणाऱ्या विषयांचा विचार करणें.

सभेस बँकेच्या सभासदांनीं अगत्य यावें अशी विनंती आहे.

बोर्डाचे हुकुमावरून

पुणें २, ३० मार्च, १९५२. — मो. वि. रबडे, मॅनेजिंग डायरेक्टर

## पाहिजेत

मॅट्रिक अगर तत्सम परीक्षा पास झालेले, हस्ताक्षर उत्तम असलेले व बाहेरगांवीं जाण्यास तयार असलेले, मराठी जाणणारे असे कारकून नेमणें आहेत. रु. ४०-५-९०: या वेतनश्रेणींत द. म. रु. ५५ अधिक महागाई भत्ता रु. ४०/- याप्रमाणें पगार मिळेल. पसंत केलेल्या अर्जदारांना दोन लायक जामीन व पांच वर्षांचा बाँड लिहून द्यावा लागेल. अर्ज दिनांक ८ एप्रिल १९५२ अखेर खालीं सही करणार यांजकडे पाठवावेत.

लक्ष्मी रोड, पुणें नं. २, पो. बॉ. नं.: ५११ — मो. वि. रबडे, मॅनेजिंग डायरेक्टर, पुणें सेंट्रल को-ऑप. बँक लि.

## आंतरराष्ट्रीय व्यापारांत निर्माण झालेली नवी समस्या

( मा. म. का. )

लंडन येथें स्टर्लिंग गटांतील राष्ट्रांच्या व्यापारी देण्याच्या प्रश्नाबद्दल चर्चा ब्रिटनचे अर्थमंत्री मि. बटलर यांच्याशीं केल्यावर हिंदचे अर्थमंत्री श्री. देशमुख यांनीं असे विचार व्यक्त केले कीं वाटाघाटींचा उद्देश चलनविस्ताराला तोंड देणें हा होता. यासाठी पतीनें चालणाऱ्या व्यवहारांवर नियंत्रण ठेवणें, सरकारी खर्चांत कपात, दीर्घ मुदतीचीं कर्जें, निर्गतींत वाढ करून जास्त पैसा मिळविणें व आयातींत कपात साधणें हे मार्ग स्वीकारले जातील. मि. बटलर यांच्याशीं त्यांनीं खुल्या मनानें चर्चा केली असून या चर्चेमुळें हिंद व ब्रिटन यांना पोषक वातावरण निर्माण होण्याची त्यांची अपेक्षा आहे. हिंदच्या आयातीबद्दल ते असे म्हणाले कीं, आयातींत आणखी कपात करणें हिंदला अशक्य आहे. डॉलर गटांतून अन्नधान्य, पेट्रोल व कापूस यांची आयात हिंदला करावी लागत असून, गव्हाची खरेदी स्टर्लिंग गटांतील देशांतून करतां येईल तरच आयातींत डॉलर गटांतील खरेदीच्या बाबतींत काटकसर साधेल. हिंदच्या एकंदर आयातींत अनावश्यक असा भाग अगदींच अल्प आहे, हेंहि विसरून चालणार नाहीं व स्टर्लिंग गटांतून धान्याची खरेदी केल्यानें एकूण आयातीवरील खर्चीहि कमी होईल असें नव्हे. विकास योजनांच्या बाबतींत जागतिक बँकेकडून आणखी कर्ज मिळविण्याचा हिंद प्रयत्न करील.

येथें दिलेल्या ह्या वरील विचारांना अनुलक्षून जागतिक आर्थिक परिस्थितीबद्दलच्या कांहीं गोष्टी विचारांत घेण्यासारख्या आहेत. त्या म्हणजे गेल्या एका वर्षांतील सर्वसाधारण अनुभव असा आहे कीं युद्धप्रयत्नांच्या दृष्टीनें करण्यांत येणारा खर्च, निर्गत व्यापाराला उत्तेजन, चलनविस्तार रोखून धरणें व राहाणीचे मान कायम ठेवणें या सर्व गोष्टी एकदम साध्य होणें कठीण आहे. एखाद्या देशानें त्या साध्य करण्याचा प्रयत्न केला व इतर देशहि हेंच धोरण आपणापुढें ठेवीत असतील तर जागतिक व्यापाराची त्यामुळें साहजिकच कुचंबणा होते. असा अनुभव गेल्या एका वर्षांत कांहींसा येत आहे असें म्हणावयास हरकत नाहीं. हा अनुभव आल्यामुळें कीं काय, खुद्द अमेरिकेनें आपला लष्करी खर्च ५·२ कोटी डॉलर्सनीं कमी केला आहे. संरक्षणाचा खर्च दीर्घकाळपर्यंत विभागला जाणार आहे. अमेरिकेच्या ह्या व्यवहारदक्षतेच्या धोरणापासून युरोपांतील इतर देश योग्य तो धडा शिकतील, व त्यापैकीं कांहीं संरक्षणाच्या खर्चाऐवजीं निर्गतीच्या वाढीकडे जास्त लक्ष देतील. संरक्षण व भांडवली माल यांवरील खर्च कमी झाला तरी इतर उपभोग्य वस्तूंच्या किंवा मालाच्या उत्पादनावर जास्त खर्च केला जाईल व त्यामुळें वस्तूंच्या बाजारभावांवर फारसा अनिष्ट परिणाम होणार नाहीं व ते कदाचित सम पातळीवर राहूं शकतील.

परंतु ही परिस्थिती तरी कायम राहील किंवा नाहीं यांबद्दलहि शंकाच वाटते. कारण, इंग्लंडप्रमाणेंच फ्रान्सनेंहि मोठ्या प्रमाणावर नियंत्रणें जाहीर केलीं आहेत. ह्या आयातीवरील कपातीमुळें आंतरराष्ट्रीय व्यापारांत नवीनच प्रश्न निर्माण होतील व त्या व्यापाराच्या खुल्या व्यवहाराला खीळ बसेल. १९५२ या वर्षी आयातीवरील निर्बंध अगदीं दूर केले जातील व आंतरराष्ट्रीय व्यापार तितक्या प्रमाणांत मोकळ्या रीतीनें चालू शकेल ही जी अपेक्षा होती ती त्यामुळें फोल ठरणार आहे असें दिसतें. युरोपियन पेमेंट युनियनच्या कार्यावरहि ब्रिटन व फ्रान्स यांच्या निर्णयाचा परराष्ट्रांच्या देण्याघेण्याचे प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीनें अनिष्ट परिणाम होणें संभवनीय आहे. याप्रमाणें आंतरराष्ट्रीय पातळीवरून व्यापारी देण्याघेण्याचे प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीनें भाषा बोलली जात असली व चर्चा केली जात असली तरी अगदीं अलिकडच्या उदाहरणांवरून प्रथम स्वतःच्या अंतर्गत प्रश्नांकडेच पाहून आपलें स्थान कायम राखण्यासाठीं निरनिराळ्या देशांकडून प्रयत्न केले जात आहेत असें दिसतें.

पुढील वर्षासाठी अमेरिकेचे अंदाजपत्रक कच्च्या अंदाजाप्रमाणें बरीच तूट दाखविणारें आहे, परंतु लष्करी किंवा संरक्षणखर्चावर कात्री लावून व शेती मालाच्या किंमती आटोक्यांत ठेवून, अंदाजपत्रकाची तोंडमिळवणी साधण्याचे प्रयत्न केले जाणार आहेत असें बोललें जातें. याची प्रतिक्रिया विशेषतः युरोप व इतर कांहीं देश यांच्या आर्थिक परिस्थितीवर होणें अशक्य नाहीं.

युरोपांतील देश व हिंद याप्रमाणेंच जपानचेंहि धोरण निर्गत व्यापार वाढविणें व आयात कमी करणें, असें आहे. या सर्वांचा समुच्चयानें परिणाम कदाचित खरेदी करणारांना अनुकूल होणें संभवनीय आहे व त्यामुळें भांडवली माल व इतर विक्री माल यांचे बाजारभाव नरमाईत येणें संभवनीय आहे. कदाचित कांहीं जिनसांच्या किंवा मालाच्या बाबतींत खरेदी करणारांची बाजार पेठ निर्माण होईल व तिचे आर्थिक परिणाम तात्पुरते हिंदसारख्या देशाला अनुकूलहि ठरतील.

ब्रिटनचे प्रयत्न राष्ट्रकुटुंबांतील देशांच्या सहकार्यानें पौंडाची किंमत स्थिर राखणें या दृष्टीनें होत आहेत. यासाठीं स्टर्लिंग गट बळकट ठेवणें व एक धोरणानें त्याला कार्यप्रवृत्त करणें ब्रिटनला आवश्यक वाटत आहे. हिंदनें स्टर्लिंग गटांत राहाणेंच हिताचें आहे व त्यांतून बाहेर पडण्याचा प्रश्नच उद्भवत नाहीं असें मत आपल्या अर्थमंत्र्यानीं व्यक्त केलेंच आहे. परंतु याचवेळीं इतर कांहीं मतप्रवाह असे आहेत कीं त्यांच्या मतें हिंदला भांडवली माल, गहूं, कापूस, या बाबतींत अमेरिकेवर अवलंबून राहावें लागणार असल्यामुळें हिंदनें कदाचित स्वतःचें धोरण आखणें फायदेशीर ठरेल. हे दोन मतप्रवाह कांहींहि दर्शवीत असले तरी आज हिंदनें रुपयाचें अवमूल्यन करण्यांत केव्हांहि शहाणपणाचें ठरणार नाहीं, एवढें निश्चित.

---

### हिंदी उद्योगधंदे

"हिंदी औद्योगिक भवितव्य आशादायक आहे. येथें मजुरीचे दर भारी नाहींत. उत्पादन, व्यवस्था आणि मालाचा दर्जा ह्यांवर प्रभावी नियंत्रण ठेवलें तर उत्पादनाचा खर्च बराच उतरण्याजोगा आहे. भारतांत उद्योगधंद्यांना फाजील संरक्षण दिलें जात आहे. कोणत्याहि स्थानिक धंद्यांस थोडेंफार संरक्षण हवें, हें खरें आहे. पण, तें देतांना लोकांच्या हितास बाध येतां कामा नये. हिंदी खेडेगांवी धंदे चांगले आखले गेले असले तरी त्यांची कार्यक्षमता फार थोडी आहे. ते नियंत्रित करण्यासाठी एखादी मध्यवर्ती संघटनेची आवश्यकता आहे.":– जपानी शिष्टमंडळाचे नेते मि. तैझो इशिझाका ह्यांचें निवेदन.

---

### जय चिंतामण!

":जय हिंद"च्या ऐवजी "जय चिंतामणं" म्हणून एकमेकांचें स्वागत करण्याची प्रथा नागपुरांत पडली असल्याचें वृत्तपत्रांत प्रसिद्ध झालें आहे. किंमती उतरल्याबद्दल लोक अर्थमंत्र्यांना धन्यवाद देत आहेत. त्याचें हें प्रतीक आहे

## महाराष्ट्राच्या विकासासाठीं नवीन लोहमार्ग

(श्री. बा. वृ. चितळे, चितळे नगरचे संस्थापक)

आधुनिक जीवन संपन्न व सुखी करण्यासाठी धरणें व वीज यांची आवश्यकता असून त्याजबरोबर मालाची नेआण करणेसाठी व ठिकठिकाणीं मालाचा पुरवठा करण्यासाठी उत्तम वाहातुकीचीं साधनें असणें आवश्यक आहे.

महाराष्ट्रांत हल्लीं असलेलीं प्रमुख धरणें नाशिक, नगर, पुणें व सोलापूर या जिल्ह्यांतच आहेत. हीं सर्व धरणें व त्यांच्या कालव्याखालीं भिजणारा अत्यंत महत्त्वाचा व उद्योगधंद्यांचा प्रदेश जर एकाच लोहमार्गाखालीं येऊं शकले व त्याच लोहमार्गानें इतर प्रांताशीं त्याचें दळणवळण जोडतां आलें तर फार चांगलें होईल. असा नवीन लोहमार्ग मनमाड–दौंड–बारामती–पंढरपूर मार्गे सोलापूरपर्यंत ब्रॉडगेज (मोठा लोहमार्ग) होऊं शकल्यास त्यायोगें मालाची ने–आण हिंदुस्थानांतील कोणत्याही प्रांतांत सुलभतेनें करतां येईल. या मी सुचविलेल्या मार्गापैकीं मनमाड–दौंड ब्रॉडगेज (मोठा लोहमार्ग) हल्लीं चालू असून दौंडपासून बारामतीपर्यंत सुमारें २८ मैल नॅरोगेज (लहान लोहमार्ग) हल्लीं चालू आहे. याचेऐवजीं दौंडपासून पंढरपूरमार्गें सोलापूरपर्यंत हा मोठा लोहमार्ग नेणें शक्य झाल्यास महाराष्ट्रांतील गोदावरी, प्रवरा, नेरा वगैरेसारखीं मोठमोठीं धरणें व कालवे व याखालीं भिजणारा महाराष्ट्रांतील अत्यंत महत्त्वाचा शेतीचा व उद्योगधंद्याचा मुलुख एकाच गेजच्या रेल्वे वाहातुकीखालीं येऊं शकेल व त्यामुळें या भागांत इतर बऱ्याच उद्योगधंद्यांना प्रोत्साहन मिळून महाराष्ट्राची आर्थिक भरभराट होईल. हा मोठा लोहमार्ग होणें अशक्य असल्यास हल्लींचा मोठा लोहमार्ग आहे तसाच ठेवून त्याऐवजीं लोणंद–पंढरपूर ते सोलापूर हा मीटर गेजचा–मध्यम–लोहमार्ग हातीं घेतल्यास यानेंही योग्य त्या वाहातुकीच्या साधनांचा लाभ होऊन आवश्यक त्या उद्योगधंद्यांना प्रोत्साहन मिळेल व माणसांच्या व मालाच्या वाहतुकीस अत्यंत आवश्यक असणारें साधन उपलब्ध होईल. ही लोहमार्गाची योजना हातीं घेऊन ताबडतोब पुरी केल्यास दक्षिण महाराष्ट्रांतील मीटर गेज–मध्यम–लोहमार्गाशीं हा लोहमार्ग जोडला जाऊन सर्व दक्षिण महाराष्ट्रांत पुण्यापर्यंत मालाची व माणसांची वाहातूक सुलभतेनें होऊन एकंदर ऊर्जितावस्था वाढण्यास मदत होईल.

पुण्यापासून बंगलोरपर्यंत हल्लीं मीटरगेज–मध्यम–लोहमार्ग अस्तित्वांत असून त्याचा फांटा कोल्हापूरपर्यंतही जातो. तरी घाटमाथा व कोंकण यांचा लोहमार्गानें संबंध जोडण्यासाठीं कोंकणपट्टीस जोडणाऱ्या ४ मार्गापैकीं एक कऱ्हाड ते चिपळूण अगर कोल्हापूर ते रत्नागिरी यांपैकीं कोणत्या तरी एका लोहमार्गाची आंखणी होऊन कोंकण व घाटमाथा आगगाडीच्या सहाय्यानें जोडला जाणें अत्यंत आवश्यक आहे. यासाठीं जबाबदार पुढाऱ्यांनीं एकत्र जमून तज्ज्ञ लोकांची एक समिति नेमून तिच्यामार्फत सरकारपुढें ती योजना ठेवावी व कोंकण व घाटमाथा यांना जोडणारा लोहमार्गाचा अत्यंत जिव्हाळ्याचा प्रश्न ताबडतोब हातीं घेऊन तो समाधानकारक रीतीनें हाताळावा अशी माझी आग्रहाची विनंति आहे.

(चिपळूण येथील 'रत्नागिरी जिल्हा गुरें व शेतकी प्रदर्शनां'त अध्यक्षीय भाषण, १३–३–१९५२)

---

**अमेरिकन धनाढ्य स्त्रीचा मृत्यू**—मिसेस विल्कस नांवाची एक धनाढ्य अमेरिकन बाई नुकतीच मरण पावली. तिनें जवळजवळ १० कोटी डॉलर्सची कमाई केली होती. त्यापैकीं ३·१ कोटी डॉलर्स बँकेच्या एकाच खातीं होते.


### ठेवी स्वीकारण्यांत येतात

ठेवींवर दरसाल दर शेंकडा ७॥ रुपये व्याज दिलें जातें. व्याज दर तीन महिन्यांनीं दिलें जातें. ठेवीदारास ठेवीची मुदत संपण्यापूर्वी आपली रक्कम परत पाहिजे असल्यास एक महिन्याच्या आगाऊ नोटिसीनें केव्हांही व्याजासह परत मिळूं शकते.

**पेडणेकर आणि कंपनी लिमिटेड**
शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी,
१७२, गिरगांव रोड, मुंबई ४
टेलिफोन २२७३८ तारेचा पत्ता : 'PEDNECO' Bombay

फोन: ३४५११ तार: SAHYOG

### दि प्रॉव्हिन्शिअल इंडस्ट्रिअल को-ऑपरेटिव्ह असोसिएशन, लि.

९ बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई १.


उत्पादकांच्या (प्रोड्यूसर्स) सोसायट्यांना असोसिएशन खालील मालाचा पुरवठा करते:—

सूत, रसायनें, रंग, कच्चीं कातडीं व चामडीं, कातडीं कमाविण्यास लागणारा माल, कमावलेलें कातडें, इ., मशीन-टूल्स आणि इक्विपमेंट इ.

आणि

खालील मालाच्या विक्रीस साहाय्य करते:—

हातमागावरील कापड (सुती व लोंकरी), धातूचें सामान, चंदनी लांकूड, रोजवुड आणि हस्तिदंती आर्टस् अँड क्रॅफ्टस्, रेशीम, जर, कातडीं व कातडी माल, खाद्य तेलें, लांकूड आणि कोळसा वगैरे.



## भोर स्टेट बँक लिमिटेड.

### अध्यक्ष श्री. म. व्यं. शिंगरे, ह्यांचें भाषण.

आठवी वार्षिक साधारण सभा दिनांक २१-३-५२ रोजीं पुणें येथें शाखा कचेरींत झाली. त्यावेळीं बँकेचे चेअरमन, श्री. म. व्यं. शिंगरे यांनीं केलेलें भाषण :—

"सन १९४९ च्या बँकिंग कायद्यान्वयें बँकांवर बरींच बंधनें आलीं असून त्यामुळें कर्जाचें प्रमाण व प्रकार हे मर्यादित झाले आहेत. कायद्यामुळें बँकेजवळ ठेवींचे प्रमाणांत रोख अगर सोनें अगर कर्जरोख्यांत रक्कम गुंतवावी लागत असून कर्ज देण्याचें प्रमाण ठेवींशीं निगडित केलें असल्यानें कर्जें काळजीपूर्वक दिलीं जातात व त्यामुळें ठेवीदारांचे हितसंबंध रक्षिले जातात. रिझर्व्ह बँकेनें बँकरेट वाढविला व सरकारी रोखे विकत न घेण्याचें ठरविल्यामुळें रोख्यांची किंमत घटली व कर्जावरील व्याजाचे दरांतहि वाढ झाली व शिवाय रिझर्व्ह बँक कायद्यान्वयें शेड्यूल्ड व नॉन-शेड्यूल्ड असा फरक असल्यानें नॉन शेड्यूल्ड बँकांना रिझर्व्ह बँकेची प्रत्यक्ष अशी मदत मिळत नाहीं.

" अगदीं अलीकडे मंदीची लाट आल्यामुळें नाणेंबाजारांत बरीच टंचाई झाली. ही लाट कां व कशी आली व त्याचें पारिपत्य काय करावें ही सर्वांच्या दृष्टीनें एक विचाराची बाब ठरली आहे. माझ्या मतें याबाबत मध्यवर्तीय सरकारनें तांतडीनें लक्ष घालून टिकाऊ अशी योजना तयार करावयास पाहिजे व देशांतील व्यापार व उद्योग हे टिकविण्याचे प्रयत्न केले पाहिजेत. आज प्रत्येक क्षेत्रांतील कार्यकर्ता उदासीन झाला असून भविष्यकाळासंबंधींहि उदासीन झाला आहे. अशा वेळीं मध्यवर्ती सरकारनें सुसूत्र व खंबीर आर्थिक धोरण स्वीकारणें जरूरीचें आहे असें वाटतें. सरकारच्या डळमळीत व अल्प मुदतीच्या धोरणानें आर्थिक घडी विस्कळीत होते व त्यामुळें अनपेक्षित घटना घडून येतात.

" आपल्या देशाच्या नवीन घटनेप्रमाणें सार्वत्रिक निवडणुकी होऊन पुढील पांच वर्षांत लोकाभिमुख असें स्थिर सरकार अधिकारसूत्रें घेईल व त्यामुळें त्यांना दूरगामी असें आर्थिक व व्यापार, उद्योगसंबंधाचें धोरण ठरवून त्याची अंमलबजावणी करणें शक्य आहे. केवळ व्यापार उद्योगाची पिछेहाट करून आर्थिक मंदी निश्चित करणें हें सरकारी धोरण असणार नाहीं किंवा तात्पुरत्या उपाययोजनेनें मंदीची लाट थोपवून जमणार नाहीं. आयात निर्यातसंबंधीं तसेंच देशांतले उत्पादन, त्याचें वाटप व किंमतीवरील नियंत्रण यासंबंधाचें धोरण ठरविलें तरच सर्व व्यवहार सुरळीत चालतील. राहणीचें मान कमी करणें व जीवनपयोगी वस्तूंचा मुबलक पुरवठा उपलब्ध करून देशांतील उत्पन्न झालेल्या मालास परदेशांत गिऱ्हाईक मिळवून परदेशांतील भारताच्या ठेवींच्या आकड्यांत वाढ होण्याचा प्रयत्न झाला पाहिजे.

" नवीन बँकिंग कायद्याप्रमाणें रिझर्व्ह बँकांची देखरेख व नियंत्रण हे सर्वच बँकांना थोड्याफार प्रमाणांत सारखें असून इतर बाबतींतहि नियमांची तरतूद सारखी आहे. परंतु रिझर्व्ह बँक ज्या सवलती अगर सोयी शेड्यूल्ड बँकांना करून देते त्याच सवलती त्यांनीं इतर बँकांना आतां बदललेल्या परिस्थितींत करून देणें योग्य व विचारार्ह आहे, असें वाटतें. मी मागें आपल्या अशाच एका सभेच्या वेळीं भाषण करतांना असें म्हटलें होतें कीं, " कोणत्याहि देशांत व्यापार, उद्योगधंदा, उत्पादन वगैरेसाठी आधुनिक साधन म्हणजे बँका होय व त्या दृष्टीनें सद्यःपरिस्थितीमध्यें केवळ निरनिराळ्या व्यवसायासंबंधीं अलग असा विचार न करतां आर्थिक प्रश्नासंबंधीं साकल्यानें विचार करावयास पाहिजे. " ही माझी सूचना आजचे परिस्थितींतहि कायम आहे, व त्याचा विचार योग्य त्या अधिकारीवर्गानें करावयास पाहिजे. नुकतीच आलेली व्यापारी मंदीची लाट व मुख्यतः जीवनपयोगी अन्नधान्य वस्तूखेरीज इतर जिनसांचे रकमांत एकदम झालेली घट लक्षांत घेतां त्याचें कारण व त्याची घसरगुंडी किती दिवस राहील याचा अंदाजहि लागत नाहीं. जीवजोपयोगी वस्तूंच्या किंमती कमींत कमी असाव्यात असें सर्वांनाच वाटतें. परंतु त्या अचानकपणें व उत्पादकास आर्थिक दृष्ट्या न परवडणाऱ्या अशा कमी असल्यास त्याचा परिणाम आर्थिक घडी विस्कळित होण्याकडे होतो. यासाठी सरकारनें सध्याचे परिस्थितीचें काळजीपूर्वक निरीक्षण करून आलेल्या परिस्थितीचा योग्य असा उपयोग करून भरीव असें धोरण आंखलें पाहिजे, व आपणहि आलेल्या परिस्थितीमुळें न डगमगतां त्यांतून योग्य असा मार्ग काढला पाहिजे.

" आपले बँकेनें भक्कम पायावर व योग्य असे प्रघात पाडून काम केलें आहे. ठेवीदार व भागीदार यांचें हित यास प्रामुख्यानें महत्त्व दिलें असून बँक भरभराटीस आणण्याचे प्रयत्न केले आहेत. वाढता खर्च लक्षांत घेतां व सध्यांचें नियंत्रित योजनेमुळें नफ्यांत जरी वाढ नसली तरी बँकेनें मिळविलेल्या ठोकळ नफ्यांत वाढ झाली आहे. आपल्या या बँकेच्या कारभारांत माझे सहकारी डायरेक्टर्स, बँकेचे अधिकारी, भागीदार, ठेवीदार वगैरेंचें फार मोठें साहाय्य झालें आहे. त्याबद्दल त्यांचे आभार मानणें योग्य आहे."

---

## इंडियन डीझेल एंजिन मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन

श्री. शंतनुराव किर्लोस्कर ह्यांच्या पुढाकारानें डीझेल एंजिनांच्या हिंदी कारखानदारांची संघटना करण्यांत आली आहे, तिचें नांव वरीलप्रमाणें आहे. १९५२-५३ सालाकरितां असोसिएशनचे अध्यक्ष म्हणून श्री. किर्लोस्कर (किर्लोस्कर ऑईल एंजिन्स लि.) व उपाध्यक्ष म्हणून मि. ए. जे. लंड (कूपर एंजिनिअरिंग वर्क्स लि.) ह्यांची निवडणूक झाली आहे.

---

## बद्रीनाथ-केदारनाथ

बद्रिनाथ आणि केदारनाथ हीं टेलिफोननें जोडण्याचें काम पुढील महिन्यांत पुरें होईल. अलकनंदा नदी ओलांडून यंत्रसामुग्री पलीकडे नेण्याच्या अडचणीमुळें, बद्रीनाथाच्या देवळास वीज देण्याचें काम स्थगित झालें होतें, तेंहि लवकरच पूर्ण होईल.

सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक, लि. (स्थापना १९१८)
शाखा :
१ दादर
२ माहीम
३ बेळगांव
४ पुणें—सारस्वत कॉलनी, सोमवार पेठ, पुणें.
बचतींच्या विविध योजना
हेड ऑफिस-गिरगांव, मुंबई.

### तांत्रिक नियतकालिकांतील जाहिराती

वृत्तपत्रांच्या अगर नियतकालिकांच्या व्यवसायांत जाहिरातींना आर्थिक दृष्ट्या असणारें महत्त्व उघडच आहे. पण, जाहिरातींचें स्वरूप हें सामान्यतः कोणत्याही वृत्तपत्रांत सारखेंच असतें. तांत्रिक विषयांना वाहिलेल्या नियतकालिकांत ज्या जाहिराती येतात त्यांचें स्वरूप कसें असावें, असा प्रश्न ब्रिटनमध्यें एका पत्रपंडितानें नुकताच उपस्थित केला आहे. मि. फॉस्टर हे इलेक्ट्रॉनिक एंजिनिअरिंग नांवाच्या नियतकालिकाचे संपादक आहेत. त्यांचें म्हणणें असें आहे कीं तांत्रिक विषयांच्या नियतकालिकांतील जाहिराती त्या त्या विषयाची स्पष्ट कल्पना देणाऱ्या असाव्या. जाहिराती वाचणाऱ्या वाचकाला असें वाटलें पाहिजे कीं आपल्याला नको असणारी वस्तू गळ्यांत मारण्याचा जाहिरातदाराचा हेतू नसून जी वस्तू पाहिजे आहे तीसंबधीं निश्चित माहिती देण्याचा त्याचा हेतू आहे.

मि. फॉस्टर पुढें म्हणतात कीं, जाहिरातींचे दोन वर्ग पडतात. पहिल्या वर्गांतील जाहिराती वाचकाला एखाद्या कंपनीची ओळख करून देतात अगर ती कंपनी काय सोय करूं शकते ह्याविषयीं माहिती देतात. ह्या जाहिराती एक प्रकारचीं व्हिजिटिंग कार्डेंच होत. अशा प्रकारच्या जाहिराती सर्व पत्रांतून येतात, आणि त्या जशाच्या तशाच तांत्रिक स्वरूपाच्या नियतकालिकांतून येणें पुष्कळदां चुकीचें आणि पैशाचा अपव्यय करणारें असतें. उदा. "गिनेस ही मदिरा तुम्हाला उपकारक आहे" अशी जाहिरात सामान्य वृत्तपत्रांत एक वेळ शोभून जाईल. पण तांत्रिक नियतकालिकांत तिचें स्वरूप बदललें पाहिजे. 'गिनेस तुमच्या आरोग्याची वृद्धि करते' असा बदल तींत केला पाहिजे. तांत्रिक नियतकालिकांतील जाहिराती ह्या माहिती देणाऱ्या आणि तपशील देऊन वाचकाची जिज्ञासा वाढविणाऱ्या अशा असाव्या. त्याचप्रमाणें, शास्त्रीय निबंधांत शब्द जसे काटेकोरपणें वापरले जातात तसेच ते तांत्रिक नियतकालिकांतील जाहिरातींतून वापरले गेले पाहिजेत. मि. फॉस्टर ह्यांच्या भाषणानंतर थोडीशी चर्चा झाली. एक जण असे म्हणाला कीं शास्त्रीय विषयांच्या जाहिरातींत काटेकोरपणा पाहिजे हें कळण्यासारखें आहे. पण एखादा नवा जिन्नस असा असतो कीं तो रोज सर्वांना लागतो. ह्या दोन्ही प्रकारच्या जाहिरातींत भेद करणें अवश्य आहे. उदा. एंजिनिअरिंगच्या व्यवसायांत लागणारीं हत्यारें ह्या जाहिराती वाचणाऱ्या वाचकाला आपल्याला काय पाहिजे ह्याची स्पष्ट कल्पना असते. म्हणून हत्यारांच्या जाहिरातींत बारकावा असणे जरूर आहे. जाहिरात करणारानें आपलें नांव वाचकाच्या कायमचें लक्षांत राहील अशी दक्षता घेणे जरूर आहे. शास्त्रीय विषयांच्या जाहिरातींविषयीं मि. फॉस्टर म्हणतात तें बरोबर आहे. अशा जाहिरातींत माहिती देणें आणि एखादी वस्तू दुसऱ्यापेक्षा अधिक चांगली का ह्याचा खुलासा करणें हीच पद्धत बरोबर आहे.

---

### बोनसचा उत्पादनाशीं संबंध हवा

"उत्पादनाशीं कांहींहि संबंध नसलेला बोनस दरसाल कामगारांना देण्याची पद्धत, वेतनाचाच एक भाग म्हणून ज्या दिवशीं सुरू झाली, तो दिवस हिंदी औद्योगिक प्रगतीच्या दृष्टीनें घातुकच ठरेल. ही पद्धत अजूनहि सोडून देतां येणें शक्य आहे. केलेल्या कामाचा मोबदला दरमहा द्यावा, चांगलें काम केल्याबद्दल किंवा ज्यास्त केल्याबद्दल अधिक रक्कम द्यावी."
:—बॉंबे चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष मि. सी. एस. पेटिट ह्यांचे वार्षिक सभेंत भाषण.


१९५० अखेरचें ११ वें यशस्वी मूल्यमापन

१९५० मध्येंही रु. २६५ लाखांवर नवीन विम्याचें पूर्ण काम.

वे स्ट र्न इं डि या

विमा कंपनीनें

आपलें सामर्थ्य, स्थैर्य व सेवा

यासंबंधींची प्रचिती पुन्हां एकवार विमा जगतास आणून दिली आहे.

दर हजारी त्रैवार्षिक बोनस

| हयातींतील पॉलिसी | हयातीनंतरची पॉलिसी |
|---|---|
| रु. २७ | रु. ३३ |

कंपनीच्या वाढत्या वैभवांत सहभागी व्हा व सर्वोत्कृष्ट फायद्यासाठीं वेस्टर्न इंडियाची निवड करा.

के. वाय. जोशी, बी. ए., एफ. आय. ए.
मॅनेजर

वेस्टर्न इंडिया लाईफ
इन्शुअरन्स कंपनी लि. सातारा.

शाखा कचेरीः— शहर: १७१ बुधवार पेठ, लक्ष्मीरोड, पुणें. फोन नंबर— ३४०२
कँप: केअर—ऑफ क्रेसवेल्स ईस्ट स्ट्रीट, पुणें—१

दि बॉम्बे प्रॉव्हिन्शिअल
को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

९ बेक हाऊस लेन, कोट, मुंबई,
स्थापन १९११

तारेचा पत्ता : फार्मर बँक
टे. नं. २५४६१
पोस्ट बॉक्स नं. ४७२

चेअरमनः-श्री. आर. जी. सरैय्या, ओ. बी. ई.

| | | |
|---|---|---|
| भरपाई झालेलें भांडवल | रु. | ४८,८५,२०० |
| गंगाजळी फंड | रु. | ३९,४८,७०० |
| ठेवी | रु. | ६,९२,८४,९०० |
| खेळतें भांडवल | रु. | १३,८०,४९,८०० |

१५ जिल्ह्यांत ६२ शाखा

भारतांतील प्रमुख शहरीं हुंड्या, बिलें वगैरे वसुलीची व्यवस्था आहे. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात. शर्तीबद्दल चौकशी करावी.

व्ही. पी. वर्दे
ऑ. मॅनेजिंग डायरेक्टर.


हें पत्र पुणें, पेठ शिवाजीनगर घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८१३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.